# स्त्री जगतातील उद्योजकता

**प्रा लुम्बिनी हरिदास गणवीर**
*गृहअर्थशास्त्र विभागप्रमुख*
*डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी कला महाविद्यालय*
*शेंदुर्जना घाट*

***सारांश***

*प्राचीन काळापासून तथाकथित उद्योगक्षेत्र हे स्त्रीच्या दृष्टीने उपेक्षित मानले गेले असले तरी विद्यमान आधुनिक व खुल्या अर्थव्यवस्थेच्या युगात स्त्री उद्योजकांनी आपल्या व्यवसायाला नव्या उंचीवर पोहोचविले आहे. अमेरिकेतील बिझनेस पत्रिका फोर्ब्सच्या आशियाच्या सूचीमध्ये पन्नास सर्वश्रेष्ठ स्त्री उद्योजकांमध्ये आठ भारतीय स्त्री उद्योजकांची निवड केली आहे. स्त्री स्वतःला सक्षम करते व व रोजगार निर्मिती करून अनेकांना उपजीविकेचे साधनही निर्माण करून देऊ शकते. एकछत्री स्वतःचं अस्तित्व स्थापन करण्याचे आणि सामूहिकरीत्या एकत्रित येऊन यशस्वी उद्योग उभा करण्याचे सामर्थ्य स्त्रीत आहे. स्त्रियांनी उद्योग क्षेत्रात यावे याकरिता स्त्रियांना उद्योग विषयक सल्ला देणाऱ्या व मार्गदर्शन करणाऱ्या अनेक लहान मोठ्या संस्थाए महिला बँक व महिलांना खास वित्तीय पुरवठा करणाऱ्या संस्था बिनसरकारी व सेवाभावी संस्था तसेच राज्य व केंद्र सरकारकडून मोठी प्रोत्साहन दिले जात आहे. भारतात अतिशय विलक्षण आणि हुशार महिला उद्योजकांची अजिबात कमतरता नाही. मात्र तरीही वस्तुस्थिती कायम राहते ती म्हणजे भारतात महिला सशक्तीकरण आणि आरक्षण या संबंधी कितीही मोठमोठे दावे केले जात असले तरी इथे विभिन्न क्षेत्राप्रमाणेच या क्षेत्रातही उद्योग जगतात त्यांना प्रचंड भेदभाव सहन करावा लागतो समाजशास्त्रज्ञ प्रोफेसर धर्मेंद्र पटनायक म्हणतात, उद्योजकांच्या वाटेत येणाऱ्या अडचणी दूर करण्याकरिता आधी समाजाचा दृष्टिकोन बदलणे आवश्यक आहे".*

**प्रस्तावना -**

अगदी प्राचीन काळापासून तथाकथित उद्योग क्षेत्र हे स्त्रीच्या दृष्टीने उपेक्षित मानले गेलेले असले तरी विद्यमान आधुनिक व खुल्या अर्थव्यवस्थेच्या युगात औद्योगिक क्षेत्रात अनेक स्त्रिया उद्योजक व कामगार म्हणून महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत. एखाद्या उद्योगाची स्थापना करून त्याचे संचालन करणारी व त्या उद्योगाला यशस्वी करण्यासाठी विविध कार्याची जबाबदारी पार पाडणारी स्त्री म्हणजे स्त्री उद्योजक. 19 व्या शतकात व विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात उद्योगधंद्यांमध्ये स्त्रियांचा वाटा अत्यंत अल्प होता. तथापि विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात व 21 व्या शतकाच्या प्रारंभी स्त्रियांचा औद्योगिक क्षेत्रातील सहभाग अत्यंत वेगाने वाढल्याचे दिसून येते.

भारताच्या तुलनेत युरोपीय राष्ट्रे अमेरिका, जपान, कोरिया, कॅनडा या पुढारलेल्या व प्रगत राष्ट्रातील महिला औद्योगिक क्षेत्रात मोठ्या संख्येने कार्यरत आहेत. तेथील अर्थव्यवस्था, सामाजिक परिस्थिती, पुरुषाच्या बरोबरीने समान दर्जा व वागणूक, शिक्षणाची संधी असे अनेक घटक त्यास कारणीभूत आहेत. प्रगत राष्ट्रांच्या संदर्भातील पाहणीच्या आधारे असे निष्पन्न झाले आहे की, धुलाई व्यवसाय (लॉन्ड्री), सौंदर्य साधना केंद्र (ब्युटीपार्लर), बेकरी उद्योग, गृह उद्योग, हॉटेल, शिक्षण व माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात महिला आपला सहभाग नोंदवत आहेत.

महिला आणि उद्योजक क्षेत्रातील स्त्रियांचे योगदान पाहता भारत सरकार आणि विकास आयुक्तांनी केलेल्या अहवालानुसार(2005.06) असा निष्कर्ष काढला की, भारताच्या महिला उद्योजकांची संख्या 17 69 285 एवढी आहे. देशातील एकूण लघुउद्योगाच्या 12.13 टक्के एवढी ही संख्या आहे. यापैकी 17 टक्के उद्योग लघुउद्योग क्षेत्रात नोंदविलेले असून उर्वरित 80 टक्के उद्योग नोंदणी नसणाऱ्या क्षेत्रात आहेत.(यानंतरच्या वर्षातील आकडेवारी उपलब्ध नाही.) Sixth Economic Census (2013 14) च्या

आकडेवारीनुसार भारतातील एकूण उद्योग क्षेत्रापैकी 13,76 टक्के उद्योग स्त्रियांचे स्वतःचे उद्योग आहेत.

Google Bain च्या १९२० च्या रिपोर्ट नुसार एकूण उद्योग क्षेत्राच्या 13,5 ते 15,5 मिलियन किंवा 20 टक्केच स्त्रियांचे स्वतःचे उद्योग आहेत.

**विषयाची निवड-**

जिथे उद्योग, विचार एधोरणे ठरविण्यात आणि चालविण्यात पुरुष आघाडीवर आहेत तिथे वैशिष्ट्यपूर्ण व प्रेरणादायी असे काहीच नाही. पण जिथे कार्पोरेट जगतात महिलांचे प्राबल्य आहे तिथे लक्षणीय आणि प्रेरणादायी असे नक्कीच काहीतरी आहे. झाशीच्या राणी पासून सावित्रीबाई फुले इंदिरा गांधी ते प्रतिभाताई पाटील किरण मुजुमदार शॉ, इंद्रा नुयी या सर्व सामर्थ्यशाली महिलांचे कार्य डोळ्यासमोर आणले तरी महिला सबलीकरण आणि आर्थिक विकास एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत असे म्हणावे लागेल. सबळ महिलां मुळेच विकासाला चालना मिळते. अमेरिकेतील बिजनेस पत्रिका फॉर्ब्स च्या एशिया सूचीमध्ये 50 सर्वश्रेष्ठ स्त्री उद्योजकांमध्ये 8 भारतीय स्त्री उद्योजकांची निवड केली आहे. यात बँकर चंदा कोचरए हॉटेल व्यवसायिक प्रिया पॉल प्रमुख आहेत. या सर्व स्त्रियांनी उद्योग जगातल्या सर्वात आव्हानात्मक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल सन्मानित केले गेले. मुद्रा अवमूल्यना सारख्या गंभीर आर्थिक संकटाच्या स्थितीतही या स्त्री उद्योजकांनी आपल्या व्यवसायाला नव्या उंचीवर पोहोचविले. तेव्हा स्त्री जगातील उद्योजकतेचे बद्दल आणखी माहिती जाणून घेण्याच्या उद्देशाने प्रस्तुत विषयाची निवड करण्यात आलेली आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे-**

- भारतातील स्त्री लघुउद्योजकांची माहिती मिळविणे.
- सफल उद्योजक बनलेल्या स्त्रियांबद्दल माहिती मिळविणे.
- लघु उद्योगाचे महत्त्व समजून घेणे.

**गृहितके-**

- स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने उद्योग करू शकत नाहीत.
- स्त्री उद्योजकांची संख्या भारतात कमी आहे.

**संशोधन पद्धती-**

प्रस्तुत विषयावरील शोधनिबंध लिहीण्यासाठी द्वितीय स्त्रोताचा आधार घेण्यात आला आहे. यामध्ये प्रामुख्याने संदर्भग्रंथ, मासिक, लेख, वर्तमानपत्र, संकेतस्थळे इत्यादी साधनांद्वारे माहिती संकलित करून विश्लेषण करण्यात आले आहे.

**भारतातील सफल महिला उद्योजिका -**

इंद्रा नुयी, किरण मुजुमदार शॉ, नैनालाल किडवाई, चंदा कोचर, सिमोन टाटा, नीलम धवन, सुलज्जा मोट्वानी, एकता कपूर यासारख्या महिलांनी उद्योग क्षेत्रात उत्तुंग भरारी घेत आपली नवीन ओळख निर्माण केलेली आहेत.

**लघु उद्योगातून यशस्वी उद्योजक झालेल्या काही स्त्रिया -**

उद्योग म्हणजे उद्योजकांचे मुल असतेए आणि मुल वाढवणं म्हणजे त्यावर योग्य संस्कार करून सक्षम करणे हे प्रत्येक उद्योजकाचे कर्तव्य असते. स्त्री म्हणजे नवनिर्माणए उपजतच तिला नवनिर्माणाचे वरदान लाभले आहे. ती उद्योग चांगल्या प्रकारे करु शकते आणि गरजेतून नवा उद्योग शोधूनही काढू शकते. ती स्वतःलाही सक्षम करते व रोजगार निर्मिती करून अनेकांना उपजीविकेचे साधनही निर्माण करून देऊ शकते.

**डेनिस चेरी** या उद्योजिकेने आपल्या आईसोबत ड्रीम व्हेव्हर्स नावाची कंपनी सुरू केली.केवळ पाचशे रुपयांच्या भांडवलात ब्युटी पार्लरएस्पा यांना लागणारी इको-फ्रेंडली उत्पादनेतयार करणे हा त्यांचा व्यवसाय आहे. ड्रीम व्हेव्हर्स चे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे येथे कार्यरत असलेल्या महिला या आर्थिक किंवा शारीरिक दृष्ट्या दुर्बल आहेत.

काही महिलांनी मिळून सुरू केलेला लिज्जत पापड हा सामूहिक उद्योग सर्वपरिचित आहे. यामागील महिलांनी उद्योगात उतरावे आणि आपला उद्योग वाढवावा अशी भूमिका घेऊन केली गेली अठरा वर्षे अविरत कार्यरत असणाऱ्या **मीनल मोहाडीकर** ह्या आपणास ठाऊक आहेत. फक्त सही करण्यापुरते अक्षरज्ञान असणाऱ्या जालना येथील सिंधी काळेगाव मधल्या **सीताबाई मोहिते** यांनी अनेक अडचणींचा सामना करीत आवळा कॅण्डी चा उद्योग

सुरू केला. लहान-मोठे 22 पुरस्कार मिळालेल्या सीताबाई आज यशस्वी उद्योजिका आहेत. त्यांची कृषिभूषण पुरस्काराबरोबरच अभ्यास दौऱ्यासाठी थायलंडला जाण्याकरिता निवड झालीए आणि महाराष्ट्राची कँडी थायलंडला गेली.

एक छत्री स्वतःचं अस्तित्व स्थापन करण्याची आणि सामुहिक रित्या एकत्रित येऊन यशस्वी उद्योग उभा करन्याचे सामर्थ्य स्त्रीत आहे.

भारत देशात अतिशय विलक्षण आणि हुशार महिला उद्योगाची अजिबात कमतरता नाही. पेप्सिकोच्या इंद्रा नुयी असोत वा आवळा कॅन्डी बनविणाऱ्या सीताबाई मोहिते असोतए एखादी स्त्री घराचे अर्थशास्त्र ज्या कौशल्याने हाताळते अगदी त्याचप्रमाणे या महिलांनी त्यांच्या व्यवसायाचे अर्थशास्त्र कौशल्याने सांभाळले आहे. आजच्या काळातील स्त्री उद्योग जगतात मोठी मोठी नावे आहेत. या सगळ्या महिला अतिशय असामान्य आहेत. त्यांनी परंपरागत मार्ग सोडून आपली नवीन वाट चोखाळली आहे. घरातील कुटुंबातील विरोध आणि परंपरागत दृष्टिकोन यामुळे न मिळालेले पाठबळए स्त्रोत आणि संधी यासारख्या भारतीय अडचणींवर त्यांनी मात केली आणि आता आर्थिक समावेशकतेच्या नव्या वाटा अतिशय उत्साहाने आणि कळकळीने दाखवीत आहेत. त्यातील अनेक महिलांनी उद्योग जगताची निवड सकारात्मक काहीतरी करावयाचे या तळमळीतून केली आहे. आर्थिक स्वातंत्र्याच्या त्यांच्या शोधात या महिला पथदर्शी ठरल्या आहेत. मात्र तरीही वस्तुस्थिती कायम राहते ती म्हणजेए स्त्री उद्योजकाची वाट सरळ नाही.

**स्त्री उद्योजकांची स्थिती-**

भारतात स्त्री सशक्तीकरण आणि आरक्षण यासंबंधी कितीही मोठे मोठे दावे केले जात असले तरी मोठमोठे दावे केले जात असले तरी इथे स्त्री उद्योजकांचा रस्ता मात्र सरळ नाही. समाजातील विभिन्न क्षेत्राप्रमाणेच या उद्योग क्षेत्रातही स्त्रीयांना प्रचंड भेदभाव सहन करावा लागतो. एवढेच नव्हे तर स्त्रियांच्या योग्यतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण केले जातात. यामुळेच महिला उद्योजकता सूचकांकाच्या ताज्या सूची मध्ये शामिल 77 देशांमध्ये भारत 70 व्या स्थानावर आहे. समाजशास्त्रज्ञ प्रोफेसर धर्मेंद्र पटनायक म्हणतात, खरेतर स्त्रियांप्रती आपल्या समाजाचा दृष्टीकोण हे मुख्य कारण आहे. बँका आणि आर्थिक संस्थांना देखील त्यांच्या योग्यतेवर संशय असतो. म्हणूनच महिला उद्योजकांना आवश्यक पुंजी जमा करण्यात खूप मेहनत करावी लागते. पटनायक म्हणतात महिला उद्योजकांच्या वाटेत येणाऱ्या अडचणी दूर करण्याकरिता आधी समाजाचा दृष्टिकोन बदलविणे आवश्यक आहे.

**निष्कर्ष -**

लघुउद्योग आणि मोठ्या स्वरूपाच्या उद्योगात अनेक भारतीय स्त्रियांनी यशाची शिखरे पादाक्रांत करीत स्वतःचे विशेष स्थान निर्माण केलेले आहे.

लघुउद्योगात कमी भांडवला पासून गुंतवणूक करून आपल्या व्यवसायाला करोडोंच्या उलाढालीत पर्यंत वाढविणाऱ्या उद्योजक स्त्रियाही आपल्या भारत देशात आहेत.

आज एकविसाव्या शतकातील स्त्री यांची आर्थिक सामाजिक स्थिती विचारात घेता महिला सबलीकरण करण्याच्या उद्देशाने स्वयंरोजगाराचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

प्राचीन काळापासून पुरुषांच्या समजल्या जाणाऱ्या तथाकथित उद्योग क्षेत्रात स्त्रीच्या दृष्टीने अपेक्षित मानले गेले असले तरी आज एकविसाव्या शतकात औद्योगिक क्षेत्रातील स्त्रियांचा सहभाग अत्यंत वेगाने वाढलेला असून त्यांनी अनेक उद्योगात आपले कार्यक्षेत्र उत्तुंग केलेले आहे. यावरून स्त्रियादेखील पुरुषांच्या बरोबरीने उद्योग करु शकतात हे स्पष्ट होते.

समाजातील इतर क्षेत्रांप्रमाणेच औद्योगिक क्षेत्रातही स्त्रियांना प्रचंड भेदभाव सहन करावा लागणे याबरोबरच स्त्रियांच्या योग्यत्यावरही प्रश्नचिन्ह निर्माण केले जातात. कदाचित त्यामुळेच विविध अहवालाच्या आकडेवारीवरून एकूण उद्योग क्षेत्रात महिला उद्योगाचे प्रमाण अतिशय कमी असल्याचे आजही स्पष्ट होते.

**उपाययोजना -**

- स्त्रीयांनी उद्योग क्षेत्रात यावे याकरिता विविध लघुउद्योग व स्वयंरोजगार या संबंधी जागरुकता निर्माण करावी.
- स्त्री उद्योगांना राज्य व केंद्र सरकारकडून दिल्या जाणाऱ्या प्रोत्साहनपर सुविधांची माहिती द्यावी.
- महिला उद्योगाला चालना देणाऱ्या शासनाच्या आकर्षक व नाविन्यपूर्ण योजनांबद्दल जनजागृती करावी.
- महिलांकरिता विशेष अनुदान देणाऱ्या योजना, कर्जपुरवठा योजना व इतर सवलती च्या योजनांची माहिती द्यावी.
- महिला बँक व महिलांना खास वित्त पुरवठा करणाऱ्या संस्थांविषयी जागरुकता निर्माण करावी.
- देशातील बिनसरकारी व सेवाभावी संस्थांनी महिला उद्योजकतेच्या विकासासाठी विविध प्रोत्साहनपर कार्यक्रम राबवावे.

**संदर्भ सूची-**

- *दैनिक पुढारी, मार्च ८, २०१६*
- *जागरण, मार्च ८, २०१६*
- *दैनिक लोकसत्ता, मार्च २०१६*
- *दुनिया, जून २८, २०१५*
- *मराठी विश्वकोश: खंड २०*
- *लोकप्रभा, मार्च २०११*
- *स्मार्ट उद्योजक, जुलै २८, २०१५*
- *मराठीमाती.डॉट कॉम/ अक्षरमंच*
- *DW made for mind: Media centre , July 26, 2015*
- *२१ व्या शतकातील स्त्री उद्योजगता: प्रा. लुंबिनी गणवीर: Apoorv knowledge, international journal of multidisciplinary research , March 2016*